CNR No. MHRG120004892022

नियमीत दिवाणी दावा क्र. २९/२०२२
देवनाथ व इतर वि. काशिनाथ व इतर

## निशाणी क्र.२१ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी कैफियत व म्हणणे दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, महत्वाचे कागदपत्र उपलब्ध न झाल्याने आणि कायद्याचे आवश्यक ज्ञान नसल्यामुळे प्रतिवादींना मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आली नाही. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. वादींनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील कारणे चुकीचे असल्याने अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे. तसेच न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या मर्जीस आल्यास अर्ज जास्तीत जास्त खर्चासह मंजूर करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

२. प्रतिवादी व वादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादींना दिनांक १०/०४/२०२३ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी होवून सुध्दा त्यांनी मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल केले नसल्यामुळे प्रतिवादींविरुध्द दिनांक ११/०७/२०२३ रोजी विना कैफियत आदेश पारीत झाला आहे. अर्जातील नमूद करण्यात आलेले कारण संयुक्तीक नसले तरी न्यायाच्या दृष्टीने दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर घेण्यासाठी खर्चासह अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या मतास मी पोहोचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी वादींना एकत्रीत ३००/- रुपये खर्चाच्या स्वरुपात

देण्याच्या अटिवर कैफियत व म्हणणे दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE

Digitally signed by SANDEEP G SARODE
Date: 2023.07.28 18:06:27 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : २८/०७/२०२३ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड